## पडताळणी कलम २२३ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता प्रमाणे

## साक्षीदार क्रमांक ०१ यांचा बयाण

मी शपथेवर खरे सांगते की,

माझे नांव : मीना दलित शिंदे,

वय : ३५ वर्ष,

व्यावसाय : मजुरी,

राहणार : रा. कान्हापुर मोहा, ता. परळी वै. जि. बीड

दिनांक २६.०३.२०२५ रोजी माझी मुलगी पुजा दलित शिंदे हिला अतुल वाव्हळे याने पळवुन नेले होते. २ ते ३ दिवसानंतर मी पोलिस स्टेशन सिरसाळा येथे तक्रार दिली. माझे नातेवाईक भक्तरा अभिमान शिंदे, जयश्री भक्तरा शिंदे, परमेश्वर अभिमान शिंदे, तुकाराम अभिमान शिंदे, सिमा तुकाराम शिंदे, राणी परमेश्वर शिंदे, विजयमाला अभिमान शिंदे या सर्व जणांनी माझी मुलगी पुजा हिला आस्वला, ता. धारुर, जि. बीड या ठिकाणी पाठविले. माझी नणंद महादेवी बंडु वाव्हळ, बंडु वाव्हळ, अनिल बंडु वाव्हळ, नामदेव बंडु वाव्हळ, लक्ष्मी तुकाराम वाव्हळ, मालन ज्ञानोबा वाव्हळ, ज्ञानोबा वाव्हळ, चरण पौळ, मिरा चरण पौळ, बाळु पौळ, चिंगु बाळु पौळ, रत्नमाला पौळ व रत्नमालाचा नवरा त्याचे नाव मला माहिती नाही या सर्व जणांनी माझी मुलगी पुजा हिचे अतुल वाव्हळ याच्याशी लग्न लावले. भक्तराज अभिमान शिंदे याने त्रीशरण पंचशील घेवुन लग्न लावले. मला या सर्व जणांनी धमकी दिली की, आम्ही पुजाचे लग्न लावुन देवुत तुला काय करायचे ते कर व मला जीवे मारण्याची धमकी दिली. माझे पती दलित शिंदे याने व या सर्व जणांनी अतुल वाव्हळ याच्याकडुन पाच लाख रुपये घेवुन लग्न लावले. त्यावेळी मी बाहेरगावी कामाला होते. सदरची बाब मला आरती कृष्णा म्हस्के याने मला सांगितले की लग्न लागले. माझी मुलगी पुजा हिचे वय १५ वर्ष आहे. माझी

मुलगी रिमांड होममध्ये आहे. मी सिरसाळा पोलिस ठाणे तक्रार दिली परंतु त्यांनी माझी तक्रार घेतली नाही. त्यानंतर मी धारुर पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली परंतु त्यांनी माझी तक्रार घेतली नाही. त्यानंतर मी एस. पी. ऑफिस बीड येथे तक्रार दिली परंतु त्यावर पुढे काही कार्यवाही झाली नाही. या नंतर मी सदरचे प्रकरण आरोपी विरुध्द आरोपीला कडक शासन करण्यात यावे याकरीता दाखल केले आहे.

स्वाक्षरीत/— माझे समक्ष, श्रवणोत्तर स्विकृत

साक्षीदाराची सही

Digitally signed by DIPAK RUSTUMRAO BORDE
Date: 2025.10.07 13:53:59 +0530

दिनांक ०७/१०/२०२५ **( दिपक आर. बोर्डे )**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, परळी वै.

( सदरील संचिका ही ऑनलाईन दाखल असल्याने साक्षीदाराची स्वाक्षरी ऑनलाईन पध्दतीने सदर जबाबावर घेण्याची सुविधा नसल्याने साक्षीदाराचा जबाब स्वाक्षरीत करण्यात आला. )